ePaper
| वर्ष - 8 | अंक - 245 | UDYAM-MH-26-0158827 |

## मी माफी मागणार नाही... अजित पवार जे बोलले तेच मी बोललो; कुणाल कामरा



महाईन्यूज ™

### आतील पानांत


- दिल्लीचा लखनौवर १ विकेटने विजय
- ऋषभ पंत पहिल्याच सामन्यात फेल
- आरक्षणावरुन संसदेत प्रचंड गदारोळ!
- खासदारांच्या पगार आणि भत्त्यांमध्ये वाढ!


www.mahaenews.com | मंगळवार, दि. 25 मार्च 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### सुशांतसिंह राजपूतची आत्महत्याच : 'क्लोजर रिपोर्ट'चा दिशा सालियन हत्या प्रकरणावर परिणाम नाही !

# आदित्य ठाकरे अडकणार!

## दिशाचे वडील सतीश आणि वकील नीलेश ओझा यांचा मोठा दावा, भक्कम पुरावे आहेत

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**प्रसिद्ध अभिनेता सुशांतसिंह राजपूत याची आत्महत्या असून त्याचा 'क्लोजर रिपोर्ट' सीबीआयने सादर केला आहे. या रिपोर्टशी आणि त्याची व्यवस्थापिका दिशा सालियन हिच्या हत्येचा काहीही संबंध नाही. तिच्या मृत्यूच्या तपासावर त्याचा काहीही परिणाम होणार नाही, असा खुलासा दिशाचे वडील सतीश आणि वकील निलेश ओझा यांनी केला आहे. त्यामुळे या प्रकरणात आमदार आदित्य ठाकरे अडकणार म्हणजे अडकणार, असा त्यांचा दावा आहे.**



### 'क्लोजर रिपोर्ट' मध्ये काय?

'सीबीआय' ने प्रसिद्ध अभिनेता सुशांतसिंह राजपूत मृत्यूप्रकरणात 'क्लोजर रिपोर्ट' सादर केला आहे. या रिपोर्टमध्ये सुशांतचा मृत्यू ही आत्महत्या होती असे म्हटले आहे. या प्रकरणात त्याची मैत्रीण रिया चक्रवर्तीला 'क्लीन चीट' ही दिली आहे. दिशाच्या वकिलांनी या क्लोजर रिपोर्टबाबत मात्र महत्त्वाचे भाष्य केले आहे.

### काय म्हणाले दिशाचे वकील?

'प्रत्यक्ष कायद्यानुसार या 'क्लोजर रिपोर्ट' ला काहीही अर्थ किंवा 'व्हॅल्यू' नाही. दुसऱ्या खटल्यावर त्याचा काहीही परिणाम होणार नाही. उदाहरणच द्यायचे झाले, तर आरुशी हत्याप्रकरण आणि इतर हत्याप्रकरणांमध्येही 'क्लोजर रिपोर्ट' न्यायालयाने मान्य केला नव्हता. दिशा सालियन केसमध्ये योग्य न्याय मिळेल.असा दावा नीलेश ओझा यांनी केला आहे.

### नव्याने चौकशीची मागणी महत्त्वाची..

दिशाच्या वडिलांनी तिच्या मृत्यूप्रकरणाची नव्याने चौकशी करण्याची मागणी केली आहे, असे पुन्हा एकदा ओझा यांनी सांगितले आहे. ओझा हे दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांची बाजू मांडत आहेत. सतीश यांनी दिशाच्या मृत्यूप्रकरणात नव्याने चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. तसेच या प्रकरणात आदित्य ठाकरे यांची चौकशी केली पाहिजे, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

### हायकोर्टात दि. 2 एप्रिल रोजी सुनावणी

मुंबई हायकोर्टात या प्रकरणाची दि. २ एप्रिलरोजी सुनावणी होणार आहे. दिशा सालियनचे मृत्यूप्रकरण २०२० मध्ये चर्चेत आले होते. पण, त्यावेळी आपल्यावर दबाव होता असा खुलासा तिच्या वडिलांनी केला आहे. त्यामुळे त्यांनी तब्बल पाच वर्षानंतर मुलीच्या मृत्यूप्रकरणी न्याय मागितला आहे.



### दिशाचे मृत्यू प्रकरण काय?

दिशा सालियनचा मृत्यू दि. ८ आणि ९ जून २०२० च्या रात्री झाला. सुशांतसिंह राजपूतच्या मृत्यूच्या सहा दिवस आधी ही घटना घडली. दरम्यान, आदित्य ठाकरे यांचे नाव या प्रकरणात समोर आल्यानंतर त्यांनी या प्रकरणी सत्ताधाऱ्यांवर टीका केली आहे. गेल्या पाच वर्षांपासून माझी बदनामी सुरु आहे, असे आदित्य ठाकरेंनी म्हटले आहे.

आता, दिशाच्या वडिलांनी सुशांतसिंह राजपूतच्या 'क्लोजर रिपोर्ट' चा काहीही परिणाम होणार नाही, असे म्हटले आहे. या खटल्याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिले आहे आणि आदित्य ठाकरे यांच्या संदर्भात कोणते पुरावे पुढे आणले जातात, हे देखील पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### अॅड. नीलेश ओझा यांचे म्हणणे काय ?

अॅड. नीलेश ओझा म्हणाले, की दिशा सालियनप्रकरणात 'एसआयटी' कडून उशीर होत आहे. आरोपींबाबत पुरावे आहेत. शिवाय, आणखी पुरावे समोर येतील. मोबाईल टॉवर लोकेशन आणि इतर पुरावे हाती येतील. आमच्याकडे प्रत्यक्षदर्शी साक्षीदारसुद्धा आहेत. आदित्य ठाकरेंच्या विरोधातही ठोस पुरावे आहेत, असेही ओझा यांनी म्हटले आहे.

## राज्यात मोठे नृत्य संकुल उभारण्यात येणार

# येत्या वर्षभरात बाराशे कार्यक्रम!

### राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. शेलार यांची मोठी घोषणा

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सांस्कृतिक विभागातर्फे येत्या वर्षभरात राज्यात बाराशे सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी रविवारी केली. 'आगामी काळात शास्त्रीय नृत्यसंवर्धन संस्थेच्या माध्यमातून राज्यात मोठे नृत्य संकुल उभारण्यात येणार असून, त्यासाठी सांस्कृतिक विभागातर्फे मदतही करण्यात येणार आहे,' असे शेलार यांनी सांगितले.**



चंद्रकांतदादा पाटील, युवा सुराज्य प्रतिष्ठान आणि शास्त्रीय नृत्य संवर्धन संस्थेतर्फे आयोजित पंडिता रोहिणी भाटे नृत्य महोत्सवाच्या सामारोप सत्रात शेलार बोलत होते. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, अंजली पाटील, नृत्य गुरू मनीषा साठे, शमा भाटे, भाजप प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, शास्त्रीय नृत्य संवर्धन संस्थेच्या सर्व पदाधिकारी, आयोजक अजय धोंगडे, भाजपचे शहर सरचिटणीस पुनीत जोशी आदी या वेळी उपस्थित होते. याच कार्यक्रमात पंडिता रोहिणी भाटे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.शेलार म्हणाले,वास्तविक अशाप्रकारचा शास्त्रीय नृत्यासाठी समर्पित असलेला महोत्सव केवळ पुण्यातच होऊ शकतो. पुढच्या वर्षी हा महोत्सव अधिकाधिक भव्यदिव्य करण्यासाठी राज्याचा सांस्कृतिक विभागही सहभागी होईल.'विख्यात भरतनाट्यम नृत्यांगना निरुपमा आणि राजेंद्र यांचा डौलदार पदन्यास, समर्थ अभिनय आणि आकर्षक हस्तमुद्रा यांचा मेळ जमलेला नृत्याविष्कार हे नामदार चंद्रकांतदादा पाटील आयोजित युवा सुराज्य प्रतिष्ठानच्या संयोजनातून आणि शास्त्रीय नृत्य संवर्धन संस्थेच्या वतीने प्रस्तुत पंडिता रोहिणी भाटे नृत्य महोत्सवाच्या अखेरच्या सत्राचे प्रमुख आकर्षण ठरले.या कलाकृतीस रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

याशिवाय कलासक्त नृत्य संस्थेने सादर केलेल्या योगिनी या ओडिसी नृत्याविष्कारास आणि उत्तुंग अभिनयाला रसिकांनी भरभरून दाद दिली.या कार्यक्रमात मुद्रा कथक नृत्य संस्थेने 'गणेश ध्रुपद' (कथ्थक), स्वरदा नृत्य संस्था 'चरिष्णू' (भरतनाट्यम्), आरोहिणी नृत्य संस्थेने 'शिव ध्रुपद' (कथ्थक), स्नेहललितने 'तिल्लान' (भरतनाट्यम्), रुपक नृत्यालयने 'चतरंग' (कथ्थक), शिल्पा नृत्यालयाने एक श्लोकी रामायण (कथ्थक), नृत्यांजली संस्थेचे श्री गणेश (भरतनाट्यम्), नृत्यभारती संस्थेचे राग सागर (कथ्थक), कलासाधनम् नृत्य संस्थेचे डमरु (भरतनाट्यम्), अर्चना नृत्यालयाचे ठुमरी (कथ्थक), रुपक कलासदनने अंजनेय स्तुती (भरतनाट्यम्) आदी नृत्याविष्कार सादर केले.

#### रोहिणी भाटे यांना श्रद्धांजली

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, अंजली पाटील, नृत्य गुरू मनीषा साठे, शमा भाटे, भाजप प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, शास्त्रीय नृत्य संवर्धन संस्थेच्या सर्व पदाधिकारी, आयोजक अजय धोंगडे, भाजपचे शहर सरचिटणीस पुनीत जोशी आदी या वेळी उपस्थित होते. याच कार्यक्रमात पंडिता रोहिणी भाटे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

---

## मंत्री असूनही 'ससून'चा कारभार अधांतरीच!

### गेल्या 10 महिन्यांपासून अद्याप पूर्णवेळ अधिष्ठाता नेमण्यात आलेला नाही

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पश्चिम महाराष्ट्रातील रुग्णांसाठी ससून सर्वोपचार रुग्णालय हे अतिशय महत्त्वाचे आहे. दररोज हजारो रुग्ण या रुग्णालयात उपचारासाठी येतात. मात्र, गेल्या १० महिन्यांपासून या रुग्णालयाचा कारभार अधांतरीच आहे. रुग्णालयाचे कामकाज प्रभारी अधिष्ठात्यांकडे असून एवढ्या काळात अद्याप पूर्णवेळ अधिष्ठाता नेमण्यात आलेला नाही. वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ या पुण्यातील असतानाही याकडे दुर्लक्ष होत आहे.**




गेल्या दोन वर्षात ससूनमध्ये गैरप्रकारांची मालिका सुरू होती. त्यामुळे एकही व्यक्ती स्थिरपणे अधिष्ठात्यांच्या खुर्चीत टिकून राहिली नाही. अमली पदार्थ तस्करीचा सूत्रधार ललित पाटील पलायन प्रकरणात नोव्हेंबर २०२३ मध्ये तत्कालीन अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांना पदावरून हटविण्यात आले. त्यानंतर तातडीने डॉ. विनायक काळे यांच्याकडे अधिष्ठातापदाची सूत्रे देण्यात आली. डॉ. काळे यांच्या कार्यकाळात पोर्श अपघात प्रकरणातील आरोपीचे रक्तनमुने बदलण्याचा प्रकार घडला. या प्रकरणी ससूनमधील न्यायवैद्यकशास्त्र विभागाचे तत्कालीन प्रमुख डॉ. अजय तावरे यांना अटक करण्यात आली. याच प्रकरणात गेल्या वर्षी मे महिन्यात डॉ. काळे यांना अधिष्ठाता पदावरून हटवून सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले.डॉ. काळे यांच्यानंतर ससूनच्या प्रभारी अधिष्ठातापदी डॉ. चंद्रकांत म्हस्के यांची गेल्या वर्षी मे महिन्यात नेमणूक करण्यात आली. डॉ. म्हस्के यांच्याकडे आधीपासून बारामतीतील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठातापदाचा कार्यभार होता. त्यांच्याकडे ससूनच्या अधिष्ठातापदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला. विशेष म्हणजे, त्या जागी मुंबईतील जे. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील अस्थिव्यंगोपचार विभागाचे प्रमुख डॉ. एकनाथ पवार यांच्याकडे ससूनचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला.

#### मंत्र्यांची एकदाही ससूनला भेट नाही

ससूनच्या अधिष्ठातापदाचा अतिरिक्त कार्यभार आहे. अद्यापपर्यंत वैद्यकीय शिक्षण विभागाने पूर्णवेळ अधिष्ठाता नेमण्याची तसदी घेतलेली नाही. ससूनमधील या प्रभारी कामकाजामुळे रुग्णालयाच्या व्यवस्थापनावर गंभीर परिणाम होत आहे. याबाबत भाजपचे आमदार डॉ. सिद्धार्थ शिरोळे यांनी नुकत्याच झालेल्या विधानसभा अधिवेशनात मुद्दा मांडला होता.

## चित्रपटाचे माध्यम मराठी भाषा संवर्धनासाठी उपयुक्त-खोराटे

# चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन!

### चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन; दोन दिवस मराठी चित्रपट पाहण्याची शहरवासीयांना पर्वणी

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. सातासमुद्रापार पोहोचलेल्या मराठी भाषेचा गोडवा अद्वितीय आहे.मराठी भाषेचे संवर्धन, भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी मराठी चित्रपटासारखे माध्यम उपयुक्त ठरणार आहे. असे प्रतिपादन महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी केले.**




'मराठी चित्रपट संवर्धन आणि प्रदर्शनास चालना' या बहूउद्देशीय संकल्पनेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि मराठी चित्रपट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'नाट्यगृहात चित्रपट' ही अनोखी संकल्पना राबविण्यात येत आहे. आज या संकल्पनेतून २४ ते २५ मार्च या कालावधीत चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे आयोजित चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

> मराठी भाषेचा अभिमान बाळगत मराठी चित्रपट पाहण्यास प्राधान्य दिले पाहिजे. यामुळे अधिकाधिक दर्जेदार मराठी चित्रपट आपल्याला पाहायला मिळतील.
> **–बाबासाहेब पाटील,** प्रदेशाध्यक्ष , मराठी चित्रपट असोशिएशन

या महोत्सवास उप आयुक्त अण्णा बोदडे, पंकज पाटील, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, मराठी चित्रपट असोसिएशनचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील, प्रदेश सरचिटणीस कौस्तुभ कुलकर्णी, प्रमुख सल्लागार व सुप्रसिद्ध अभिनेते निळू फुले यांची कन्या गार्गी फुले,उपाध्यक्ष नितीन धवणे पाटील, विश्वजित बारणे, उपस्थित होते. मराठी भाषेतील चित्रपट जगले पाहिजे त्यांचा प्रसार झाला पाहिजे यासाठी या मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन केले आहे.

आपण देखील मराठी भाषेचा अभिमान बाळगत मराठी चित्रपट पाहण्यास प्राधान्य दिले पाहिजे यामुळे अधिकाधिक दर्जेदार मराठी चित्रपट आपल्याला पाहायला मिळतील. असे मत यावेळी बोलताना असोशिएशनचे कौस्तुभ कुलकर्णी यांनी व्यक्त केले. या महोत्सवांतर्गत नुकतेच प्रदर्शित झालेले मराठी चित्रपट अत्यंत नाममात्र दरात दाखवले जात आहेत.

---

## दुर्गादेवी टेकडीवरील शेकडो वृक्षांची कत्तल

### पर्यावरण प्रेमींचा कडाडून विरोध; आयुक्तांकडे सोपवले नागरिकांच्या स्वाक्षरीचे निवेदन

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**निगडी येथील दुर्गादेवी टेकडीवर विविध विकास कामांसाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून शेकडो वृक्षांची कत्तल होणार असल्याचा आरोप करत पर्यावरण प्रेमींनी त्यास कडाडून विरोध केला आहे. सह्यांची मोहीम राबवून तब्बल साडेतीन हजारांहून अधिक नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना त्यांनी दिले. सिंह यांनीही दुर्गादेवी टेकडीला भेट देत नागरिकांशी संवाद साधला.**



शहर अभियंता मकरंद निकम, पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, स्थापत्य, उद्यान, क्रीडा विभागाचे सह शहर अभियंता मनोज सेठिया, राहुल कादरी, प्रकल्प विभागाचे विजय भोजने यांच्या मोठ्या संख्येने निसर्ग व व्यायाम प्रेमी नागरिक यावेळी उपस्थित होते.

दुर्गादेवी टेकडीवर यापूर्वी पोलिस प्रशासनाचा वाहतूक नियंत्रणासाठी टॉवर लावण्यात आला आहे. आता १६ दक्षलक्ष लिटर पाण्याची टाकी उभारण्याचे नियोजन महापालिका प्रशासनाने केले आहे. तर भारतीय हवामान खात्याचा एक वीस मीटर उंचीचा टॉवरही टेकडीवर लावण्यात येणार आहे. ही सर्व कामे करताना दुर्गा टेकडीवरील सुमारे ४० ते ५० वर्षांपूर्वीची शेकडो झाडे तोडण्यात येणार आहेत. त्यामुळे पशू-पक्षी, प्राणी यांचा नैसर्गिक अधिवास संपुष्टात येणार असून पर्यावरणाची खूप मोठी हानी होणार आहे. त्यामुळे या प्रकल्पांना निसर्ग प्रेमींकडून आणि दुर्गादेवी टेकडी बचाव समितीकडून विरोध करण्यात येत आहे. निसर्गप्रेमींच्या मागण्यांची दखल घेत आयुक्त सिंह यांनी दुर्गादेवी टेकडीवर भेट देत नागरिकांचे म्हणणे ऐकून घेतले. काय तोडगा काढता येईल का ? याबाबतही चर्चा केली. त्यावर उपाय करू, असे आश्वासनही दिले.


#### पर्यावरण प्रेमींचा आंदोलनाचा पवित्रा

पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांची देवा यनकुळे, रमेश कोरे, अरुण थोपटे, प्रवीण पायाळ, मल्लिकार्जुन प्यारसाबादी, हरेश शेट्टी, नितीन शेट्टी, सुरेश घुले, बोऱ्हाडे, रघुनाथ रोकडे, किरण पाचपुते आदी निसर्गप्रेमींच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन निवेदन दिले. कुठलाही प्रकल्प दुर्गादेवी टेकडीवर करू नये अन्यथा जोरदार आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनात देण्यात आला.

> दुर्गादेवी टेकडी उद्यानात अन्य काही सुविधा देता येतील का ? तसेच अन्य काही सुशोभीकरण, नवीन मॉडेल राबविण्याबाबत उद्यान विभागामार्फत येथे आयुक्तांचा दौरा नियोजित होता. त्यादरम्यान पर्यावरण व व्यायाम प्रेमीं देखील आयुक्तांपुढे येथील पाण्याच्या टाकी विषयी समस्या सांगितल्या. त्यांचे म्हणणे ऐकून घेत उपाय करण्याचे आश्वासन यांनी दिले आहे.
> **–प्रमोद ओंभासे,** मुख्य अभियंता, पाणी पुरवठा विभाग

# लोकशाहीचे चारही स्तंभ, भ्रष्ट वाळवीने पोखरलेले!

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### प्रपंच हा परमार्थाला साधन म्हणून वापरावा.

आपले खरे समाधान भगवंताजवळ आहे आणि ते मिळण्यासाठी भगवंताचे प्रेम आम्हांला लागणे जरूर आहे. ते प्रेम आपल्याला कसे मिळेल याचा आपण विचार करू. वास्तविक, आईचे तिच्या मुलावरचे प्रेम स्वाभाविक असते, तिला मुलावर प्रेम कर म्हणून शिकविण्याची जरुरी नसते; त्याप्रमाणे भगवंतावर आपले प्रेम असणे जरूर आहे. मनुष्यजन्म हा भगवंताच्या प्राप्तीसाठी आहे. ईश्वराने एवढी सृष्टी निर्माण केली, पण मनुष्यदेह निर्माण केल्यावर त्याला फार आनंद झाला. त्याला वाटले, खरोखर या योनीमध्ये जन्म घेणाऱ्याला माझे प्रेम मिळविता येऊन मला ओळखता येईल. असे असताना मनुष्यप्राण्याला भगवंताचे प्रेम स्वाभाविक का बरे असू नये ? मनुष्यप्राणी हा नेहमी आनंदासाठी धडपडत असतो; मग या धडपडीतून भगवंताचे प्रेम त्याला का बरे येऊ नये? मला वाटते, ज्या ध्येयासाठी आपण धडपडत असतो ते ध्येय ठरविताना आम्ही चुकत असलो पाहिजे खास. आमचे ध्येय असे असले पाहिजे की, त्यातून आम्हांला शाश्वत आनंद मिळविता आला पाहिजे. तो आनंद जर एवढ्या कष्टाने, मेहनतीनेसुद्धा आम्हांला मिळत नसेल तर आमचे ध्येयच चुकले असे म्हणायला कोणती अडचण आहे तुम्ही सांगा ! आज प्रपंच आम्हांला हवासा वाटतो, प्रपंचातल्या नाना तऱ्हेच्या गोष्टी आम्हांला सुख देतील असे वाटत असते, आणि त्या मिळविण्यासाठी आम्ही अहर्निश झटत असतो. वस्तूसाठी चाललेली आमची धडपड ही खरे पाहता त्या वस्तूसाठी नसून, त्यातून मला आनंद मिळेल या कल्पनेने, त्या आनंदासाठी आम्हांला ती वस्तू हवी असते. त्या वस्तूत मला समाधान मिळेल ही कल्पना नाहीशी व्हायला पाहिजे. आज प्रपंचात मला समाधान मिळेल असे वाटते; ती माझी कल्पना नाहीशी होणे जरूर आहे. ही प्रपंचाची आस जोपर्यंत आहे तोवर भगवंताचे दास आम्हांला होता येणार नाही, आणि शाश्वत समाधान आम्हांला मिळणार नाही. 'तूं जगाची आस सोडून दे, मी तुला शाश्वत आनंद देतो' असे भगवंत आम्हांस सांगत आहे. ही जगाची आस, हे प्रपंचाचे प्रेम, आम्हांला कसे सुटेल ? प्रपंच सोडल्याशिवाय भगवंताचे प्रेम आम्हांला येणारच नाही का ? प्रपंच सोडून देण्याची आज आमची तयारी नाही. तो न सोडता भगवंताचे कसे होता येईल, ह्यासाठी संतांनी मार्ग सांगितला आहे, त्या मार्गाने आम्ही जाणे जरूर आहे. ज्याप्रमाणे आपण आपल्या या खिशातील पैसे त्या खिशामध्ये ठेवतो, त्याचप्रमाणे प्रपंचातील आपले मन आपण काढून भगवंताकडे लावावे. तसे करण्यात समाधान आहे. भगवंताला अशी प्रार्थना करावी की, "देवा ! प्रारब्धाने आलेले भोग येऊ देत, पण तुझे अनुसंधान मात्र चुकू देऊ नकोस."

**बोधवचन:- दिवा जळायला हवा असेल तर त्यामध्ये सतत तेल घातले पाहिजे, तसे भगवंताचे अनुसंधान सारखे राहण्यासाठी त्याचे नामस्मरण आपण सतत करीत असावे.**



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**भारतीय लोकशाही मजबूत होत चालली आहे, असे म्हणत आपण ऊर बडवत असलो तरी आपल्या लोकशाहीचे चारही स्तंभ भ्रष्टाचाराच्या वाळवीने पोखरलेले आहेत, दुर्दैवाने हे दररोज सिद्ध होत आहे!**

### संसद सदस्यांचे चारित्र्य?

लोकशाहीचा पहिला स्तंभ म्हणजे संसद..संसदेवर निवडून गेलेले लोकप्रतिनिधी काय लायकीचे आणि किती गुण उधळणारे आहेत, हे आपण अनुभवत आहोतच ! बोटावर मोजण्याइतके स्वच्छ चारित्र्याचे लोकप्रतिनिधी संसद भवनात बसलेले आहेत. अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी यांच्यापासून मधु दंडवते, मधु लिमये, जॉर्ज फर्नांडिस असे प्रतिनिधी आता भेटणे अवघड आहे. त्यांच्या पन्नास टक्के चारित्र्यसंपन्नता सापडली तर खूप झाले, असे म्हणण्याची वेळ आली आहे. आता, निवडून येण्यासाठी पैसा खर्च करा, आणि निवडून आल्यानंतर पुढील पाच वर्षे तो वसूल करण्यासाठी झटा, हे तंत्र वापरावे लागते !

### प्रशासनात बोकाळलेला भ्रष्टाचार..

देशाची संपूर्ण यंत्रणा हलवणारे प्रशासन कोणत्या थराला जाऊ शकते, हे आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. जिल्हाधिकारी कार्यालयातील साधा शिपाईसुद्धा सध्या कोट्यधीश असतो. ज्येष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे सोडा.. संपूर्ण सरकार चालवण्याची त्यांचीच जबाबदारी असते आणि त्याचा पुरेपूर मोबदला ते 'वसूल' करतात. निवडून येणारे लोकप्रतिनिधी पाच वर्षांसाठी असतात, ही 'बाबू' मंडळी मात्र आयुष्यभर जनतेची 'मोबदला' घेऊन सेवा देत 'काळजी' घेत असतात !

### न्यायालये, मीडिया केव्हाही मॅनेजेबल ..

तिसरा स्तंभ न्यायालये.. जिथे पाहिजे तो न्याय विकत मिळू शकतो आणि चौथा स्तंभ 'मीडिया' चा..भारताच्या मीडियाची क्षमता आणि वकूब सगळ्यांना पुरेपूर माहीत आहे. 'मीडिया' मॅनेज केला, की निवडणुकासुद्धा जिंकू शकतात, हे गेल्या काही वर्षांत दिसून आले आहे. मीडियाला 'दुधारी अस्त्र' म्हटले जाते. व्यवस्थित हाताळला गेला तर तुम्ही जिंकलात, पण विरोधी गेला की तुमची वाट लागली, हे प्रत्येक राजकारण्याला आणि शासनकर्त्याला माहीत आहे. थोडक्यात काय, मीडियाचा वापर जसा करता येईल तसा करता येतो !

### न्यायाधीशाकडे करोडोंचे घबाड !

हे सर्व आत्ताच आठवण्याचे कारण म्हणजे गेल्याच आठवड्यात एका न्यायाधीशाच्या घरात संपूर्ण खोली भरून नोटांचे घबाड सापडले. अक्षरशः कोट्यवधीच्या बेहिशेबी नोटा ! न्यायालये पोखरलेली आहेत आणि न्याय विकत मिळू शकतो असे आरोप केले जात होते. पण त्या न्यायाधीशाच्या रूपाने प्रत्यक्ष पुरावेच हाती आले, हे लक्षात घ्या !




### न्यायमूर्तींच दरोडे टाकू लागले..

सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा हे या महाभागाचे नाव ! त्यांच्या बाबतीत बातमी वाचली आणि मेंदूला मुंग्या आल्या. अजून काय काय पाहावे लागणार आहे, कोणास ठाऊक, असे म्हणत मनाचे समाधान करून घेतले.

### न्यायाधीशाचे हे प्रकरण जरा हटके !

पूर्वी, न्यायालयातील भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे वाचली होती ऐकली होती..पण, हे शर्माप्रकरण मात्र फारच हटके आहे. त्यांच्या बंगल्याला आग लागली, म्हणून निदान जनतेला समजले तरी..नाहीतर हा भ्रष्ट माणूस नोटांच्या नोटा गिळंकृत करत खोटे निवाडे करत बसला असता. आग लागल्यामुळे समजले तरी की, इतक्या खोली भरभरून नोटा होत्या. आगच लागली नसती तर अजून किती खोल्या भरल्या असत्या, ते महालक्ष्मीलाच ठाऊक ? बरे, हे एकच न्यायाधीश असे आहेत का? अजून असणार आहेत. मग आता त्यांच्यादेखील घराला ( खऱ्या अर्थाने खाली ) आग लागण्यासाठी वाट पाहायची का? सापडला तर चोर नाहीतर शिरजोर, असे म्हणतात ते खरेच आहे.

### रामशास्त्री बाण्याचे न्यायमूर्ती हवेत..

आज एक घटना आठवते.. अर्थातच ती ऐकिवात आहे. नीलकंठ दाभोळकर हे हायकोर्टचे न्यायाधीश असताना एका डाक बंगल्यावर थांबले असता त्याच बंगल्यावर एक मंत्रीही मुक्कामास होते आणि नेमकी त्यांची केस याच दाभोळकरांच्या समोर होती. भेटणे तर दूरच, पण साधी ओळख देखील दाखविण्याची त्या मंत्र्यांची हिम्मत झाली नाही. अशी रामशास्त्री प्रभुणे बाण्याची माणसे देखील आहेत. घरातसुद्धा नातेवाईकांमध्ये बसल्यावर कोर्टातील केसेस बद्दल त्यांच्यासमोर कोणी बोलायचे धाडस करीत नव्हते. दुसरे उदाहरण वाचलेले आठवते ते म्हणजे, मंगळवेढ्यात पी. पी. कुलकर्णी म्हणून न्यायाधीश होते. दर महिना शासनाकडून दोन हजार रुपये पेट्रोलभत्ता त्यांना मिळत होता. तो भत्ता घेण्यास त्यांनी नकार दिला. माझ्या स्कूटरला महिन्याला आठशे रुपये पेट्रोलसाठी पुरतात, वरचे बाराशे रुपये मला नको आहेत, असे लेखी वरिष्ठांना कळविणारा देवमाणूस देखील आपल्या देशात निर्माण झालेला आहे, हे लक्षात घ्या.

### कोर्टात खरेच न्याय मिळतो ?

म्हणूनच न्यायाधीशाकडे कोट्यवधीचे घबाड सापडले, अशा बातम्या वाचल्या, की खंत तर नक्कीच वाटणार ना ! कोर्टात खरोखर न्याय मिळतो का, या मूळ प्रश्नाचे उत्तर वर्मा यांच्या नोटांच्या अग्निकांडामुळे मिळाले आहे,असे वाटते. सुप्रीम कोर्टातील एका महिला न्यायाधीशांनी तीन हजार पानांचे पोलिसांचे म्हणणे कोणी वाचायचे, म्हणून केजरीवाल यांना जामीन मंजूर केला होता, ही घटना ताजी आहे. पुण्यातील अतिशय धनाढ्य बापाच्या मुलाने पोर्षे कार अपघातात दोघांना चिरडून मारले, पण ५०० शब्दांचा निबंध लिहून जामीन दिला गेला, ही घटनाही अगदी ताजी आहे. हे सर्व हास्यास्पद तर आहेतच, पण न्यायपालिकेवरचा विश्वास उडवणाऱ्या या गोष्टी आहेत.

### विद्यमान मंत्र्याचे उदाहरण ताजे!

विद्यमान मंत्री माणिकराव कोकाटे यांचे उदाहरण असेच हास्यास्पद म्हणावे लागेल. त्यांनी भ्रष्टाचार केल्याबद्दल ताशेरे ओढले गेले आहेत. पण, विनाकारण खर्च होईल, म्हणून त्याची सुनावणी बाजूला ठेवली गेली आहे, धन्य आहेत सगळ्या गोष्टी ! याचाच अर्थ पैशाच्या जीवावर न्यायालये डोलत असतील, तर पैसेवाल्यांनी कितीही गुन्हे केले तरी चालतील, असाच अर्थ सर्वसामान्यांनी घ्यायचा का?

### अशांच्या घराला आग लागो..

म्हणूनच मन आता एवढ्यासाठी तयार झाले आहे, की अशा भ्रष्ट लोकांच्या घराला रोज आग लागावी, तेवढेच काय ते मनाला समाधान ! एकूणच लोकशाहीचे चारही स्तंभ हा चेष्टेचा विषय झाला आहे. शेवटी एकच म्हणावेसे वाटते, जर न्यायाधीश विकत मिळत असतील, तर वकिलांच्या फी साठी कशाला खर्च करायचा ? लोकशाहीचे चारही स्तंभ जर पोखरले गेले असतील, तर लोकशाहीचा हा डोलारा म्हणजेच गोवर्धन पर्वत बोटावर उचलून धरण्यासाठी एखाद्या श्रीकृष्णानेच पुढे यावे असे वाटू लागले आहे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कुणाल कामरा विरोधात वॉरंट!

## ‘आंखो मे मस्ती....’ गाण्याच्या चालीवर विडंबनात्मक कविता!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याच्या अडचणीत वाढ होण्याची चिन्हे शक्यता आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर स्टँडअपमध्ये कवितेच्या माध्यमातून टीका केली होती. आता राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी कामरा याचे सीडीआर व बँक अकाऊंट तपशील तपासणार असल्याचे म्हटले आहे. कामराच्या विरोधात सध्या वॉरंट निघाले असून, पोलिस त्याचा तपास करत आहेत. कामरा याने केलेल्या टीकेनंतर शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी कामरा याच्या खार येथील ऑफिसची तोडफोड केली होती.**

दरम्यान, शनिवारी मुंबईतील ‘हॅबिटॅट’ स्टँडअप कॉमेडी शोमध्ये कुणाल कामराने महाराष्ट्रातील राजकारणावर भाष्य करत एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली. ही टीका समाजमाध्यमावर पसरल्याने शिंदेंचे शिवसैनिक आक्रमक झाले. राहुल कनाल आणि कुणाली सरमळकर यांनी पदाधिकाऱ्यांसोबत जात कुणालच्या स्टुडिओमध्ये तोडफोड केली होती. कुणाल कामराच्या ऑफिस तोडफोड प्रकरणी ताब्यात घेतलेल्या शिवसेना कार्यकर्त्यांना जामिन मिळाला आहे. खार पोलिस ठाण्यात त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला होता. . प्रत्येकी १५ हजारांच्या जातमुचलक्यावर हा जामीन न्यायालयाने मंजूर केला आहे. कामरा याने केलेल्या टीकेनंतर शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी कामरा याच्या खार येथील ऑफिसची तोडफोड केली होती. त्यांना न्यायालयाने जामीन दिला आहे. कामरा याने २०२२ मध्ये जे महाराष्ट्राच्या राजकारणात सत्ताकारण घडले होते त्याच्यावर कवितेच्या माध्यमातून टीका केली होती. त्याने आपल्या स्टॅन्डअप शोमध्ये ही कविता सादर करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना गद्दार म्हटले होते. ‘दिल तो पागल





है’ या चित्रपटातील ‘आंखो मे मस्ती....’ या गाण्याच्या चालीवर त्याने ही विडंबनात्मक कविता सादर केली होती. त्याच्यामध्ये शिंदे गुवाहाटीला गेल्याचा उल्लेख केला होता, तसेच ‘बाप चोरल्याचा’ उल्लेखही केला होता. कुणाल कामराचा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर मुंबई ठाणे मध्ये याचे पडसाद उमटले. या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रीया समोर आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा अपमान करणे हे चुकीचे असून, हा अपमान सहन केला जाणार नाही अशा लोकांना त्यांची जागा दाखवण्यात येईल. ते पुढे म्हणाले की हास्यविनोद करणे यात काही गैर नाही पण मोठ्या नेत्यांना बदनाम करुन त्यांचा अपमान होईल असे वक्तव्य करणे पुर्णत चुकीचे आहे.

कामरा याने माफी मागितली पाहिजे. कामराने उपमुख्यमंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे मुख्य नेते एकनाथ शिंदेंबद्दल यांच्याबद्दल एक गाणं गायलं. त्याचे पडसाद राजधानी दिल्लीत आणि संसदेच्या अधिवेशनातही उमटले. या प्रकरणावरून विरोधी पक्षाच्या खासदारांनी राज्य सरकारवर टीका केली तर सत्ताधारी पक्षाच्या खासदारांनी या वक्तव्याला चुकीचे असल्याचे म्हटले. बोलण्याचे स्वातंत्र्य आहे म्हणून काहीही बोलू नये, असेही सत्ताधारी खासदार म्हणाले.ओटीटी प्लॅटफॉर्म आणि स्टँडअप कॉमेडी शोजमध्ये मोठ्या प्रमाणावर आक्षेपार्ह, अयोग्य आणि संवेदनशील टिप्पण्या करण्यात येतात.

त्यामुळे संबंधित व्यक्ती आणि समाजघटकांविषयी अनादराची भावना निर्माण होते. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ठोस धोरणात्मक निर्णय घेण्याची मागणी केली आहे. डॉ. गोऱ्हे यांनी फडणवीस यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, भारतीय घटनेने प्रत्येक नागरिकाला भाषण स्वातंत्र्य दिले आहे, मात्र त्याचा गैरवापर स्वतःच्या प्रसिद्धीसाठी किंवा अन्य व्यक्ती अथवा समाजघटकाच्या प्रतिमेला धक्का पोहोचवण्यासाठी होऊ नये. या माध्यमांवर होणाऱ्या वक्तव्यांमुळे समाजात तेढ निर्माण होऊ शकते, त्यामुळे योग्य ती आचारसंहिता तयार करणे गरजेचे आहे.

### दमानिया यांची शंका

कुणाल कामरा हा कॉमेडियन आहे. मात्र तो जे बोलला ते कॉमेडियनकडून अपेक्षित नाहीच, कुणाल कामराला असे बोलण्याची काहीच गरज नव्हती. मात्र त्यानंतर शिंदे गटाच्या लोकांनी केलेली तोडफोड योग्य नाही. त्यासाठी शिंदे गटाकडून तोडफोडीची वसुली केली पाहिजे, अशी प्रतिक्रिया कुणाल कामरा प्रकरणावर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी दिली. तसेच स्वप्ना पाटकरबद्दल खासदार संजय राऊत यांच्यावर जे आरोप केले गेले तो विषय बाजूला करण्यासाठी तर कुणाल कामराकडून असे बोलून घेतल नसेल ना? अशी शंकाही त्यांनी व्यक्त केली.

---

# कामराच्या मुद्द्यावरुन विधान परिषेदत राडा

## दानवेंनी मांडलेल्या मुद्याला सामंत यांचं आक्रमक उत्तर

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची खिल्ली उडवली. त्यांच्या विरोधात एक गाणं त्याने स्टँड अप कॉमेडी शोमध्ये गायलं. ज्यानंतर मुंबई तो ज्या स्टुडिओत आला होता त्या स्टुडिओची शिवसैनिकांनी तोडफोड केली. आज अधिवेशनातही हा मुद्दा गाजला. अंबादास दानवेंनी मांडलेल्या मुद्द्याला उदय सामंत यांनी उत्तर दिलं.**

सभापती महोदय, मुंबईत एक घटना घडली. पोलीस अधिकारी उपस्थित असताना स्टुडिओवर काही लोकांनी हल्ला केला. मंगळवार आणि बुधवारी आपण संविधानावर चर्चा करणार आहोत.



चर्चा करताना मुलभूत अधिकार, नागरिकांची कर्तव्यं. असं असताना कुणाल कामराने विडंबन कविता सादर केली. कॉमेडियन अशा गोष्टी सादर करत असतात. अशात सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तोडफोड केली. या कार्यकर्त्यांनी सोलापूरकर, कोरटकर यांच्यावर काही भाष्य केलं नाही.” असं अंबादास दानवे यांनी म्हणताच सभागृहात गदारोळ सुरु झाला. दानवे पुढे म्हणाले म्हणाले, “छत्रपती शिवरायांचा अपमान करणारे लोक कोरटकर आणि सोलापूरकर आहेत. तरीही एका कॉमेडियनचा निषेध नोंदवला जातो, पोलिसांच्या उपस्थिती तोडफोड झाली.राज्याचे मुख्यमंत्री म्हणतात कॉमेडियनने माफी मागितली पाहिजे.
अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार सरकार हिरावून घेतं आहे का? राज्याचे मुख्यमंत्र्यांनी गुन्हेगारांवर कारवाई केली पाहिजे. अशा पद्धतीने सत्ताधारी पक्षाचेच लोक तोडफोड करतात. कोरटकर, सोलापूरकर बाबत हे शांत का बसले आहेत? मला वाटतं कायदा आणि सुव्यवस्था सत्ताधारी पक्ष बिघडवत आहेत. तोडफोड करणाऱ्या सगळ्यांनाच अटक झाली पाहिजे.
अशी मागणी अंबादास दानवे यांनी म्हटलं आहे.विरोधी पक्षनेत्यांनी जो मुद्दा मांडला तो मांडून विषयाला भलतीकडेच नेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. ज्या व्यक्तीचं समर्थन करत आहेत ती व्यक्ती कशी आहे? याचं ब्रिफिंग घ्यायला हवं होतं. पण आदेश आल्यामुळे, सांगितलं गेल्यामुळे विरोधी पक्षनेते असं बोलत असतील. विरोधी पक्षनेत्यांबाबत आमचं काही म्हणणं नाही.
पण त्यांच्यावर दबाव असल्याने हे बोलत आहेत. कुणाल कामरा राहुल गांधींबरोबर भारत जोडो यात्रेत होता. तसंच एकनाथ शिंदेंपुरता हा विषय मर्यादित नाही. त्याने पंतप्रधान नरेंद्र मोदींबाबत जी काही वाक्य बोलली आहेत ती इथे सांगण्यासारखी नाहीत. मराठी भाषेचा मंत्री मी इथे आहे.

### लगेच पाठिंबा कसा मिळतो?

अशा गोष्टींचं समर्थन कुणी करु नये. एकनाथ शिंदे यांचा सत्कार महाराष्ट्राची संस्कृती जपली म्हणून वारकरी बांधवांनी केला होता त्यांच्याबाबत कुणाल कामरा बोलला आहे, आनंद महिंद्रा, मुकेश अंबांनींबाबत बोलला आहे. आपण त्याचं समर्थन करता कामा नये. असं उदय सामंत म्हणाले.

# मुस्लिम आरक्षणावरुन संसदेत गदारोळ!

## जे. पी. नड्डा आणि मल्लिकार्जुन खरगे यांच्यात शाब्दिक चकमक

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मुस्लिम आरक्षणाच्या मुद्द्यावरुन राज्यसभेत आज दोन दिग्गज नेत्यांमध्ये शाब्दिक चकमक झालेली पाहण्यास मिळाली. संसदीय कामकाज मंत्री किरण रिजेजू यांनी कर्नाटक सरकारने मुस्लिम आरक्षण देण्याबाबत जो निर्णय घेतला तो मुद्दा केला. त्यावेळी जे. पी. नड्डा यांनी हे आरक्षण म्हणजे घटनेच्या तत्त्वाचं उल्लंघन असल्याचं म्हटलं.**



### अफवा पसरवल्या जात आहेत

आता त्यांचाच पक्ष संविधान बदलण्याची भाषा करतो आहे.दरम्यान काँग्रेसचे नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी सगळे आरोप खोडून काढले आहेत. भारताची राज्यघटना वाचवण्याचं काम फक्त काँग्रेसनेच केलं आहे. संविधान बदलण्याची कुठलीही शक्यता नाही अफवा पसरवल्या जात आहेत असंही खरगे म्हणाले.


सरकारी कंत्राटं देताना अल्पसंख्याकांना चार टक्के आरक्षण देण्याबाबतचा निर्णय घेतला आहे. त्या तरतुदीबाबत राज्यसभेत जे.पी. नड्डा यांनी कर्नाटक सरकारवर जोरदार टीका केली आणि काँग्रेसवरही टीका केली. याबाबत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी आरक्षण कुणीही रद्द करु शकत नाही असं ठणकावून सांगितलं. राज्यसभेत जे. पी. नड्डा, किरण रिजेजू यांनी आरोपांच्या फैरी झाडल्या. ज्यानंतर मल्लिकार्जुन खरगेंनी त्यांना उत्तर दिलं. काँग्रेसचा संविधान वगैरे बदलण्याचा काहीही विचार नसल्याचं खरगे म्हणाले.राज्यसभेचं कामकाज सुरु होताच संसदीय कामकाज रिजेजू यांनी कर्नाटक सरकारच्या मुस्लिम आरक्षणाचा मुद्दा उपस्थित केला. डी.के. शिवकुमार यांनी प्रसंगी राज्यघटना बदलण्यास तयार असल्याचं म्हटलं होतं तो उल्लेखही करण्यात आला. रिजेजू म्हणाले हे वक्तव्य एखाद्या सामान्य व्यक्तीकडून आलं असतं तर त्याकडे दुर्लक्षही केलं असतं. मात्र डी.के. शिवकुमार हे घटनात्मक पदावर आहेत त्यांनी असं बोलणं अत्यंत चिंताजनक आहे असं रिजेजू म्हणाले."विरोधाक बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो गळ्यात घालून फिरतात पण आता ते संविधान बदलण्याची भाषा करत आहेत. संविधान बदलून मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याची काय योजना आहे?" असा सवाल काँग्रेसला त्यांनी केला. तर खरगे यांनी उत्तर देत काँग्रेस संविधानाशी छेडछाड करण्याचा कुठलाही हेतू नाही असं सांगितलं.भाजपाचे नेते जे.पी. नड्डा म्हणाले की संविधानच्या तत्त्वाचं उल्लंघन करत आहेत. धर्माच्या आधारावर आरक्षण दिलं जाणार नाही, बाबासाहेब आंबेडकर यांनीच हे सांगितलं होतं. संविधान रक्षणाचा ढोल वाजवण्याचं काम काँग्रेसकडून केलं जातं. आता त्यांचाच पक्ष संविधान बदलण्याची भाषा करतो आहे.दरम्यान काँग्रेसचे नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी सगळे आरोप खोडून काढले आहेत. भारताची राज्यघटना वाचवण्याचं काम फक्त काँग्रेसनेच केलं आहे. संविधान बदलण्याची कुठलीही शक्यता नाही अफवा पसरवल्या जात आहेत असंही खरगे म्हणाले. कंत्राटं देताना अल्पसंख्याकांना चार टक्के आरक्षण देण्याबाबतचा निर्णय घेतला आहे. त्या तरतुदीबाबत राज्यसभेत जे.पी. नड्डा यांनी कर्नाटक सरकारवर जोरदार टीका केली आणि काँग्रेसवरही टीका केली. याबाबत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी आरक्षण कुणीही रद्द करु शकत नाही असं ठणकावून सांगितलं. राज्यसभेत जे. पी. नड्डा, किरण रिजेजू यांनी आरोपांच्या फैरी झाडल्या. ज्यानंतर मल्लिकार्जुन खरगेंनी त्यांना उत्तर दिलं. काँग्रेसचा संविधान वगैरे बदलण्याचा काहीही विचार नसल्याचं खरगे म्हणाले.राज्यसभेचं कामकाज सुरु होताच संसदीय कामकाज रिजेजू यांनी कर्नाटक सरकारच्या मुस्लिम आरक्षणाचा मुद्दा उपस्थित केला. डी.के. शिवकुमार यांनी प्रसंगी राज्यघटना बदलण्यास तयार असल्याचं म्हटलं होतं तो उल्लेखही करण्यात आला. रिजेजू म्हणाले हे वक्तव्य एखाद्या सामान्य व्यक्तीकडून आलं असतं तर त्याकडे दुर्लक्षही केलं असतं. मात्र डी.के. शिवकुमार हे घटनात्मक पदावर आहेत त्यांनी असं बोलणं अत्यंत चिंताजनक आहे असं रिजेजू म्हणाले."विरोधाक बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो गळ्यात घालून फिरतात पण आता ते संविधान बदलण्याची भाषा करत आहेत. संविधान बदलून मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याची काय योजना आहे?" असा सवाल काँग्रेसला त्यांनी केला. तर खरगे यांनी उत्तर देत काँग्रेस संविधानाशी छेडछाड करण्याचा कुठलाही हेतू नाही असं सांगितलं.भाजपाचे नेते जे. पी. नड्डा म्हणाले की संविधानच्या तत्त्वाचं उल्लंघन करत आहेत. धर्माच्या आधारावर आरक्षण दिलं जाणार नाही, बाबासाहेब आंबेडकर यांनीच हे सांगितलं होतं.

# खासदारांच्या पगार आणि भत्त्यांमध्ये भरघोस वाढ!

## महागाई दरात वाढ झाल्यामुळे वेतन आणि भत्ते वाढविण्यात आले

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मार्च महिना संपत आला आहे. आर्थिक वर्ष २०२४ – २५ संपणार आहे. यामुळे नोकरी करत असलेल्यांना पगारवाढीचे वेध लागले आहेत. या पार्श्वभूमीवर आनंदाची बातमी आली आहे. तब्बल सात वर्षांनंतर खासदारांच्या पगार आणि भत्त्यांमध्ये भरघोस वाढ झाली आहे. ही वाढ १ एप्रिल २०२३ पासून लागू होणार आहे.**



### तब्बल सात वर्षांनंतर वाढ

हा आढावा महागाई दरावर आधारित आहे. याआधी कर्नाटक विधानसभेने मुख्यमंत्री, मंत्री आणि विधिमंडळ सदस्यांच्या पगारात वाढ करण्याची तरतूद करणारे विधेयक मंजूर केले. या विधेयकात विधानसभा अध्यक्ष आणि विधान परिषद अध्यक्षांचे मासिक वेतन ७५ हजार रुपयांवरून १.२५ लाख रुपये करण्यात आले.

पगारवाढीची अधिसूचना जारी झाली आहे. महागाई दरात वाढ झाल्यामुळे वेतन आणि भत्ते वाढविण्यात आले आहेत. हा निर्णय २०१८ पासून लागू केलेल्या नियमांतर्गत घेण्यात आला आहे, ज्यामध्ये दर पाच वर्षांनी खासदारांच्या वेतन आणि भत्त्यांचा आढावा घेण्याची तरतूद आहे. हा आढावा महागाई दरावर आधारित आहे. याआधी कर्नाटक विधानसभेने मुख्यमंत्री, मंत्री आणि विधिमंडळ सदस्यांच्या पगारात वाढ करण्याची तरतूद करणारे विधेयक मंजूर केले. या विधेयकात विधानसभा अध्यक्ष आणि विधान परिषद अध्यक्षांचे मासिक वेतन ७५ हजार रुपयांवरून १.२५ लाख रुपये करण्यात आले. आधी खासदारांचा मासिक पगार एक लाख रुपये होता. आता खासदारांचा मासिक पगार एक लाख २४ हजार रुपये असेल. खासदारांचा दैनिक भत्ता सध्या दोन हजार रुपये आहे जो वाढीनंतर अडीच हजार रुपये होणार आहे. खासदारांचे निवृत्ती वेतन आधी दरमहा २५ हजार रुपये होते, आता ते दरमहा ३१ हजार रुपये असेल. जर खासदार म्हणून पाच वर्षांपेक्षा जास्त काळ काम केले असेल तर आधीच्या कार्यकाळातील प्रत्येक वर्षासाठी आधी दरमहा दोन हजार रुपये निवृत्ती वेतन होते ते आता दरमहा अडीच रुपये एवढे मिळेल. खासदारांना ७० हजार रुपये मतदारसंघ भत्ता देखील मिळतो. २०१८ च्या दुरुस्तीनुसार, हे पैसे खासदारांना मतदारसंघातील जनसंपर्क खर्च म्हणून दिले जातात. याशिवाय, त्यांना दरमहा कार्यालयीन भत्ता म्हणून ६०,००० रुपये आणि संसदीय अधिवेशनादरम्यान दैनिक भत्ता म्हणून २००० रुपये मिळतात. हे भत्तेही आता वाढवले जातील. पगारवाढीची अधिसूचना जारी झाली आहे. महागाई दरात वाढ झाल्यामुळे वेतन आणि भत्ते वाढविण्यात आले आहेत. हा निर्णय २०१८ पासून लागू केलेल्या नियमांतर्गत घेण्यात आला आहे.

# ‘शिवा’ मालिकेतील अभिनेत्री आता नव्या रुपात झळकणार!

छोट्या पडद्यावर सध्या विविध विषयांवर आधारित नव्या मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. एक आगळावेगळा विषय घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला लवकरच येतेय ‘हुकुमाची राणी’. आता ही राणी नेमकी कोण आहे आणि ती सर्वांच्या मनावर कशी राज्य करणार याची पहिली झलक नुकतीच प्रेक्षकांसमोर आलेली आहे. ‘सन मराठी’ वाहिनीवर लवकरच ‘हुकुमाची राणी ही...’ ही नवीन मालिका सुरू होणार आहे. मालिकेच्या प्रोमोची सुरुवात कामगारांना कंपनीने दिलेल्या जाहीर सूचनेने होते. यावर कामगारांना १८ तास काम करणं बंधनकारक आहे असं मजकूर लिहिलेला असतो. एवढे तास कसं करायचं या संभ्रमात कामगार पडतात. इतक्यात याठिकाणी मालिकेच्या नायकाची एन्ट्री होते. ही भूमिका अभिनेता अक्षय पाटील साकारत आहे. तो सर्वांना दटावून नियमांचं पालन करावंच लागेल अशी ताकीद देतो.कामागारांची सभा सुरू असताना मोठ्या रुबाबात येते या मालिकेतील हुकुमाची राणी...ती फळ्यावर लिहिलेले १८ तास खोडते आणि ८ तास लिहिते. याशिवाय




हुकुमावरून हा शब्द खोडून ती ‘८ तास काम कायद्यानुसार’ असं फळ्यावर नमूद करते. तिच्या एन्ट्रीने कामगारांना एक नवीन हुरुप मिळतो.“मुजोरशाहीला पाजणार पाणी, सर्वांच्या मनावर राज्य करणार ‘हुकुमाची राणी’... नवी मालिका ‘हुकुमाची राणी ही’ लवकरच... आपल्या सन मराठीवर.” असं कॅप्शन देत या नव्या मालिकेचा प्रोमो इन्स्टाग्रामवर शेअर करण्यात आला आहे. ‘हुकुमाची राणी ही’ या मालिकेत मुख्य भूमिका अभिनेत्री वैभवी चव्हाण साकारत आहे. यापूर्वी ‘झी मराठी’च्या ‘शिवा’ मालिकेत तिने प्रियाची भूमिका साकारली होती. त्यामुळे आता वैभवीला ‘हुकुमाची राणी ही’ या नव्या मालिकेत मुख्य भूमिका साकारण्याची संधी मिळणार आहे. सध्या संपूर्ण कलाविश्वातून या मालिकेच्या पहिल्या प्रोमोवर कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे. दरम्यान, ‘हुकुमाची राणी ही’ या मालिकेची निर्मिती ‘लागिरं झालं जी’, ‘देवमाणूस’ फेम श्वेता शिंदेने केली आहे. त्यामुळे या मालिकेकडून प्रेक्षकांना प्रचंड अपेक्षा आहेत. छोट्या पडद्यावर सध्या विविध विषयांवर आधारित नव्या मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. एक आगळावेगळा विषय घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला लवकरच येतेय ‘हुकुमाची राणी’. आता ही राणी नेमकी कोण आहे आणि ती सर्वांच्या मनावर कशी राज्य करणार याची पहिली झलक नुकतीच प्रेक्षकांसमोर आलेली आहे. ‘सन मराठी’ वाहिनीवर लवकरच ‘हुकुमाची राणी ही...’

## अथिया शेट्टी-केएल राहुल झाले आई-बाबा

अभिनेत्री अथिया शेट्टी व क्रिकेटपटू केएल राहुल आई-बाबा झाले आहेत. बॉलीवूड अभिनेता सुनील शेट्टीची लेक अथियाने आज गोंडस बाळाला जन्म दिला आहे. अथिया व राहुल यांनी इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करून चिमुकल्या सदस्याच्या आगमनाबद्दल माहिती दिली आहे. केएल राहुल व अथिया शेट्टी यांनी लग्नानंतर दोन वर्षांनी आपल्या पहिल्या बाळाचं स्वागत केलं आहे. अथिया शेट्टीने मुलीला जन्म दिला आहे. अथिया व तिच्या पतीने इन्स्टाग्रामवर शेअर केली आहे. अथियाने शेअर केलेल्या या पोस्टवर चाहत्यांनी लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव केला आहे. तसेच इंडस्ट्री व क्रीडा विश्वातील अनेकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. परिणीती चोप्रा, मृणाल ठाकूर, मसाबा गुप्ता, क्रिती सेनॉन, कियारा अडवाणी, मलायका अरोरा, शनाया कपूर, आयशा श्रॉफ, सोफी चौधरी, अर्जुन कपूर, टायगर श्रॉफ यांनी अथिया व केएल राहुल यांचं अभिनंदन केलं आहे.

## यामीच्या घरी गुडन्यूज?

बॉलिवूड अभिनेत्री यामी गौतमसध्या तिच्या आर्टिकल 370 या सिनेमामुळे चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वीच आर्टिकल 370 या सिनेमातील तिचा फर्स्ट लूक पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. याशिवाय टिझर आणि सिनेमाच्या रिलीज डेटबाबतही घोषणा करण्यात आली आहे. सिनेमाची घोषणा करण्यात आल्यानंतर अभिनेत्री यामी गौतमने पती आणि आई समवेत दिसली होती. दरम्यान आता यामीचा लूक पाहिल्यानंतर ती प्रेग्नंट असल्याच्या बातम्या व्हायरल होत आहेत. मात्र, या प्रेग्नंसीबाबत्या बातम्यांना यामीकडून कोणतेही प्रत्युत्तर देण्यात आलेले नाही. यामी गौतम आणि आदित्य धर मुंबईत एकत्रित स्पॉट झाली. यावेळी यामीने गुलाबी कलरचा सूट घातलेला दिसतोय. तर दिग्दर्शक आदित्य धर पांढऱ्या रंगाच्या कुर्त्यामध्ये यामीसोबत दिसत आहेत. दोघे एकत्रित दिसले आणि यामीच्या वेगळ्याच लूकने चाहत्यांचे लक्ष वेधलं आहे. यामी गौतम प्रेग्नंट असल्याच्या बातम्यांनी जोर धरलाय. दरम्यान यामीने गुलाबी सूटच्या ओढणीला वेगळ्या अंदाजात कॅरी करताना पाहिले. त्यामुळे सोशल मीडियावर चाहते यामी प्रेग्नंट असल्याची शक्यता वर्तवताना दिसत आहेत.



## एका क्रांतिकारी युगपुरुषाचा गौरव!

बॉलीवूडची देसी गर्ल प्रियांकाचा पती निक जोनास हा अमेरिकेतील प्रसिद्ध गायक आहे. निकचे मोठे भाऊ केविन आणि जो यांच्यासह ‘जोनास ब्रदर्स’ नावाचा त्यांचा बँड आहे, जो जगभरात प्रसिद्ध आहे. निक जोनास व त्याचे भाऊ केविन जोनास आणि जो जोनास हे भारतात आले आहेत. मुंबईच्या महालक्ष्मी रेसकोर्सवर शनिवारी त्यांचा भव्य संगीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा त्यांचा भारतातील पहिला संगीत कार्यक्रम होता. भारतात निक आणि जोनास ब्रदर्सचे प्रचंड चाहते आहेत. निक गाण्यासाठी स्टेजवर येताच जमलेल्या प्रेक्षकांनी ‘जीजू’ असे संबोधित निकचे स्वागत केले. किंग आणि निकच्या “तू मान मेरी जान” या कोलॅबरेटेड गाण्यावर प्रेक्षक मंत्रमुग्ध होताना दिसले.जोनास ब्रदर्सचा भारतात पहिलाच कार्यक्रम असल्याने चाहते अतिउत्साही दिसत होते. शनिवारच्या या कार्यक्रमाचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होताना दिसत आहेत. यात जोनास ब्रदर्स त्यांच्या कार्यक्रमाचा पुरेपूर आनंद घेताना दिसले.यातला मजेशीर भाग म्हणजे, जो आणि केविनने चाहत्यांना निकची ओळख ‘जीजू’ म्हणून करून दिली, त्यामुळे तिथे जमलेल्या प्रेक्षकांनी निकचा ‘जीजू’ ‘जीजू’ असा जयघोष करत स्वागत केले. २०२३ ला रीलिज झालेल्या “‘तू मान मेरी जान’ X ‘आफ्टरलाईफ’” या गाण्यावर निक आणि किंगने एकत्र संगीत सादर केलं. कॉन्सर्टदरम्यान निक मजेशीररित्या प्रेक्षकांना म्हणाला, “भारतात परफॉर्म करण्याची आमची ही पहिलीच वेळ आहे. यात २०१८ मध्ये झालेल्या प्री वेडिंगमधला संगीत सोहळा ग्राह्य धरला जात नाही.”भारतासाठी असलेल्या आपल्या भावना व्यक्त करत निक प्रेक्षकांना म्हणाला, “एक कुटुंब म्हणून आपलं या देशाशी घट्ट नातं आहे. तुमच्या या उत्साहपूर्ण स्वागतासाठी धन्यवाद. या संगीत

## आयशा खानने सांगितला ‘तो’ किस्सा

बिग बॉसच्या घरात वाईल्ड कार्ड एंट्री करणारी आयशा खान ही सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. आयशाचा एक एक व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये ती तिच्या बालपणाशी संबंधित एक धक्कादायक घटना सांगताना दिसत आहे. आयशानं एका मुलाखतीमध्ये सांगितलं की, ती 9 वर्षांची असताना एका व्यक्तीनं तिच्यासोबत वाईट कृत्य केलं होतं.आयशा खानने अलीकडेच सिद्धार्थ कन्नन्च्या मुलाखतीत तिच्यासोबत बालपणी घडलेल्या घटनेबद्दल सांगितलं. तिनं मुलाखतीमध्ये सांगितलं, "एक काका आले आणि त्यांनी मला बोलावले. मी विचारले, काय हवं काका? त्यांनी मला एक पत्ता विचारला. मग त्यांना मी तो पत्ता सांगितला. मग त्यांनी विचारले की, मी तिथे तुला घेऊन जाऊ शकतो का? मी त्यांना होकार दिला."पुढे आयशा म्हणाली, "ते काका आणि मी एका इमारतीत गेलो. तिथून खाली येत असताना त्यांनी अचानक मला पायऱ्यांवर ढकलले. यानंतर ते माझ्यावर जबरदस्ती करू लागले. त्या क्षणी मला समजत नव्हते की, काय होत आहे. पण काहीतरी चुकीचं घडतंय हे माझ्या लक्षात येत होतं. पण नक्की काय होतंय? ते मी समजू शकले नाही. 9 वर्षाच्या मुलीला हे सर्व समजू शकत नाही. मला ओरडता येत नव्हते. त्यांनी माझ्या तोंडावर हात ठेवला. मीओरडण्याचा प्रयत्न करत होते मी त्यांना म्हणत होते, माझी आई तिथेच उभी आहे. प्लीज काका मला जाऊ द्या." यशानं पुढे मुलाखतीत सांगितलं.’बिग बॉस 17’ या कार्यक्रमाचा ग्रँड फिनाले आज पार पडणार आहे. बिग बॉसच्या घरात वाईल्ड कार्ड एंट्री करणारी आयशा खान ही सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे.



# दिल्लीचा लखनौवर 1 विकेटने विजय!

## आशुतोष शर्मा एकटाच भिडला; लिहिली अनपेक्षित विजयाची कहाणी

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशुतोष शर्माच्या विस्फोटक खेळीच्या जोरावर दिल्ली कॅपिटल्सने लखनौ सुपर जायंट्स संघावर एका विकेटने दणदणीत विजय मिळवला आहे. आशुतोष शर्मा आणि विपराजच्या खेळीने लखनौच्या मोठ्या धावसंख्येला आव्हान देत उत्कृष्ट भागीदारी रचली आणि संघाच्या विजयाचा पाया रचला. दिल्ली कॅपिटल्सने सुरूवातीला ६ विकेट्स गमावले असतानाही लखनौवर एका विकेटने विजय मिळवला आहे.**



डोंगराएवढ्या लक्ष्याचा पाठलाग करताना विशाखापट्टणम इथे झालेल्या लढतीत दिल्लीने शरणागतीच पत्करली होती. मात्र आशुतोष शर्माच्या अविश्वसनीय खेळीच्या जोरावर दिल्लीने थरारक विजय साकारला. २१० धावांचा पाठलाग करणाऱ्या दिल्लीची अवस्था ६५/५ अशी होती. ट्रिस्टन स्टब्स आणि विपराज निगम यांनी पाया रचला. यानंतर आशुतोष शर्माने ३१ चेंडूत ५ चौकार आणि ५ षटकारांसह नाबाद ६६ धावांची तडाखेबंद खेळी साकारली.लखनौने मिचेल मार्श आणि निकोलस पूरन यांच्या वेगवान अर्धशतकी खेळींच्या बळावर २०९ धावांचा डोंगर उभारला होता. मार्शने ३६ चेंडूत ६ चौकार आणि ६ षटकारांसह ३६ चेंडूत ७२ धावा चोपून काढल्या.

पूरनने ३० चेंडूत ६ चौकार आणि ७ षटकारांसह ७५ धावा कुटल्या. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ४२ चेंडूत ८७ धावांची भागीदारी रचली. ही भागादारी फुटल्यानंतर लखनौचा वेग मंदावला.लखनौचा नवा कर्णधार ऋषभ पंत ६ चेंडूत भोपळाही न फोडता तंबूत परतला. डेव्हिड मिलरने २७ धावा केल्या आणि त्याच्या अखेरच्या दोन चेंडूंवरील षटकारामुळे लखनौनं दोनशेची वेस ओलांडली. दिल्लीकडून कुलदीप यादवने ४ षटकात अवघ्या २० धावा देत २ विकेट्स पटकावल्या. मिचेल स्टार्कने ३ विकेट्स घेतल्या.प्रत्युतरादाखल खेळताना शार्दूल ठाकूरच्या पहिल्याच स्पेलमध्ये जेक फ्रेझर मॅकगर्क आणि अभिषेक पोरेल तंबूत परतले. समीर रिझवी सिद्धार्थची शिकार ठरला. अनुभवी फाफ डू प्लेसिसने २९ धावा केल्या. पण रवी बिश्नोईने त्याची खेळी संपुष्टात आणली. नवोदित दिग्वेश राठीने दिल्लीचा कर्णधार अक्षर पटलेला माघारी धाडलं.निम्मा संघ तंबूत परतलेला असताना ट्रिस्टन स्टब्स आणि विपराज निगम यांनी ३५ चेंडूत ४८ धावांची भागीदारी केली.

### चौकार, षटकारांची लयलूट

धावगतीचं आव्हान १२च्या पल्याड गेलेलं असताना आशुतोष-विपराज जोडीने २२ चेंडूत ५५ धावा कुटल्या.मोक्याच्या क्षणी राठीने विपराजला बाद केलं. त्याने १५ चेंडूत ३९ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. त्यानंतर मिचेल स्टार्क आणि कुलदीप यादवही बाद झाले. पण आशुतोषने हार मानली नाही. कुलदीप बाद झाल्यावर आशुतोषने चौकार-षटकार लगावले. शेवटच्या षटकात दिल्लीला ६ चेंडूत ६ धावा हव्या होत्या. शाहबाझ अहमदचा पहिला चेंडू निर्धाव पडला. दुसऱ्या चेंडूवर मोहित शर्माने एक धाव काढली. तिसऱ्या चेंडूवर आशुतोषने विजयी षटकार लगावत दिल्लीच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. ऋषभ पंतने सोडलेला एक झेल आणि स्टम्पिंग लखनौला चांगलंच महागात पडलं.ट्रिस्टन स्टब्स आणि विपराज निगम यांनी ३५ चेंडूत ४८ धावांची भागीदारी केली. स्टब्ज बाद झाल्यानंतर सामन्याचं पारडं लखनौच्या दिशेने झुकलं.

# ऋषभ पंत पहिल्याच सामन्यात फेल

## पंत सहा चेंडू खेळून शून्य धावांवर बाद झाल्याचे पाहायला मिळाले

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयपीएल २०२५ स्पर्धेत आज (सोमवार) लखनऊ सुपर जायंट्स आणि दिल्ली कॅपिटल्स हे दोन संघ विझागमधील एसीए- व्हीडीसीए मैदानावर एकमेकांशी भिडले. दरम्यान फलंदाज ऋषभ पंत हा त्याचा माजी संघ दिल्ली कॅपिटल्स विरोधात पहिलाच सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला. मात्र २०२५ च्या आयपीएल हंगामातील पहिलाच सामना खेळताना पंत सहा चेंडू खेळून शून्य धावांवर बाद झाल्याचे पाहायला मिळाले.**



पंत याला १४व्या षटकामध्ये भारतीय क्रिकेटसंघातील त्याचा सहकारी कुलदीप यादव याने बाद केले. गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात आलेल्या मेगा ऑक्शनमध्ये २७ वर्षीय पंतला लखनऊच्या संघाने २७ कोटी रुपये खर्चून करारबद्ध केले होते. यामुळे पंत हा आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू ठरला आहे.दरम्यान एलएसचीचे चाहते आज पंतकडून एका दमदार खेळीची अपेक्षा करत होते, पण तो शून्यावर बाद झाल्याने त्यांना निराश व्हावे लागले.

दरम्यान स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात पंत अपयशी ठरल्यानंतर सोशल मीडियावर त्याला ट्रोल केले जात आहे.ऋषभ पंत याने २०१६ मध्ये दिल्ली कॅपिटल्स संघाकडून आयपीएलमध्ये पदार्पण केले होते. गेल्या वर्षी या संघातून बाहेर पडण्यापूर्वी त्याने या फ्रँचायझीसाठी ११२ सामन्यांमध्ये ३२०० पेक्षा जास्त धावा केल्या होत्या.दरम्यान पहिल्याच सामन्यात शून्य धावांवर बाद झालेल्या पंतला सोशल मीडियावर चांगलेच ट्रोल केले जात आहे. वापरकर्ते त्याला २७ कोटी रुपये देऊन विकत घेतल्याबद्दल आश्चर्य व्यक्त करत आहेत.२७ कोटी देऊन खरेदी केलेला खेळाडू श्यून्यावर बाद झाला म्हणत एका वापरकर्त्याने पंतची खिल्ली उडवली आहे. आज आयपीएल २०२५ चा चौथा सामना खेळवला जात आहे. ज्यामध्ये दिल्ली कॅपिटल्स आणि लखनऊ सुपर जायंट्सचे संघ एकमेकांशी भिडले आहेत. दिल्ली कॅपिटलचे सह-मालक पार्थ जिंदाल यांनी गेल्या वर्षी आयपीएल २०२५ साठी फ्रँचायझीने पंतला कायम का ठेवले नाही याबद्दल भाष्य केले होते. रिषभ पंत हा संघाचे व्यवस्थापन कसे केले जावे याबद्दल वेगळ्या वेव्ह लेन्थवर होता असे जिंदाल म्हणाले होते.


### इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू

त्यानंतर पंत लखनऊ सुपर जायंट्स संघात सहभागी झाला. लखनऊच्या संघाने त्याच्यावर २७ कोटींची बोली लावली आणि तो आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू ठरला.पंत याला १४व्या षटकामध्ये भारतीय क्रिकेटसंघातील त्याचा सहकारी कुलदीप यादव याने बाद केले. गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात आलेल्या मेगा ऑक्शनमध्ये २७ वर्षीय पंतला लखनऊच्या संघाने २७ कोटी रुपये खर्चून करारबद्ध केले होते. यामुळे पंत हा आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू ठरला आहे.दरम्यान एलएसचीचे चाहते आज पंतकडून एका दमदार खेळीची अपेक्षा करत होते, पण तो शून्यावर बाद झाल्याने त्यांना निराश व्हावे लागले. दरम्यान स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात पंत अपयशी ठरल्यानंतर सोशल मीडियावर त्याला ट्रोल केले जात आहे.ऋषभ पंत याने २०१६ मध्ये दिल्ली कॅपिटल्स संघाकडून आयपीएलमध्ये पदार्पण केले होते. गेल्या वर्षी या संघातून बाहेर पडण्यापूर्वी त्याने या फ्रँचायझीसाठी ११२ सामन्यांमध्ये ३२०० पेक्षा जास्त धावा केल्या होत्या.दरम्यान पहिल्याच सामन्यात शून्य धावांवर बाद झालेल्या पंतला सोशल मीडियावर चांगलेच ट्रोल केले जात आहे. वापरकर्ते त्याला २७ कोटी रुपये देऊन विकत घेतल्याबद्दल आश्चर्य व्यक्त करत आहेत.

# वडिलांच्या स्वाभिमानातून साकारले “स्वराज्य लॉजिस्टिक”!

**बीडसारख्या दुष्काळग्रस्त आणि संघर्ष पाचवीला पुजलेल्या गावांमध्ये जन्म झाला. आई - वडील ऊसतोड कामगार. मात्र वडिलांचा स्वाभिमानी आणि करारी स्वभाव होता. त्यांनी मोठ्या मुलाला शहराकडे पाठवले. “शहरात जा आणि घरच्या पुढच्या जबाबदाऱ्या सांभाळ” असे सांगितले. बंधू शहरात आले. त्यांनी नोकरी करताना व्यवसायात हात घातला. थोडी उभारी मिळाली आणि मग मलाही शहरात बोलून घेतले. मी येताना सोबत पाचशे रुपये होते तेच भांडवल म्हणून शहरात घेऊन आलो. वडिलांची शिकवण आणि त्यांचे कष्ट डोळ्यासमोर ठेवत पाचशे रुपयांच्या याच भांडवलावर आज सुमारे शंभर गाड्यापर्यंतचा मालक झालो.” हे सांगतायेत आपले आयकॉन शंकर रामकिसन तांबे.**

> “कोणाचे फुकटचे सोने सुद्धा नको” हीच शिकवण वडील आयुष्यभर देत राहिले. स्वाभिमानाने जगणे त्यांनी शिकवले म्हणूनच शुन्यातूनही यश मिळत गेले.”
> - शंकर रामकिसन तांबे



## आई-वडिलांच्या जिद्दीमुळे मिळाले शिक्षण

शंकर तांबे यांचा जन्म मराठवाड्याच्या बीडमधील, शिरूरकासार राक्षसभुवन तांबा येथील. वडील रामकिसन तांबे हे ऊसतोड कामगार. वीस वर्षे त्यांनी बारामती या भागात ऊस तोडण्याचे काम केले. तीन बहिणी आणि तीन भाऊ असे सहा भावंडे. शंकर तांबे सांगतात ‘चिंधीला चिंधी जोडून म्हणता येईल असाच संसार होता’. गरीबी, संघर्ष, कष्ट हेच नेहमी पाहत आलो. मात्र वडिलांचा स्वभाव करारी आणि स्वाभिमानी होता. त्यांच्या कष्टाला, जिद्दीला आईची कणखर जोड होती. वडिलांनी या गरीबीतही आम्हा भावंडांना शिकवलं. आम्ही तिघे भाऊ पदवीधर झालो. दुष्काळी भाग असल्यामुळे आई-वडील ऊस तोडणीचे काम करायचे. या व्यतिरिक्त दुसरे काम या भागात नव्हतेच. त्यामुळे वेळप्रसंगी आम्हाला देखील ऊस तोडायला जावे लागायचे. कामाची कोणतीही लाज बाळगायची नाही हे वडिलांकडून शिकत आलो.

## जगण्याचा संघर्ष

घरचे वातावरण अतिशय संस्कारी आणि धार्मिक वृत्तीचे होते. वडील वारकरी संप्रदायातील असल्याने चुकीच्या मार्गाने मिळवलेले काहीच नको असे सांगायचे. त्यामुळे आम्ही देखील कधीही कष्टाची लाज बाळगली नाही. शेती, ऊस तोडणी, वीट भट्टी, वाळू भरणे, तळ्यासाठी माती भरणे यांसारखी कामे मी देखील करत होतो. तीन वर्ष मी ऊस तोडणी केली. कापसाच्या गाड्या भरल्या. सैन्य भरतीसाठी देखील प्रयत्न करत होतो. 2002 मध्ये माझे सिलेक्शन देखील झाले होते. मात्र घरच्या जबाबदाऱ्यांमुळे मी जाऊ शकलो नाही. तिघे भाऊ इथेच राहिले तर यांनाही आपल्यासारखे आयुष्यभर ऊस तोडणी करावी लागेल असा विचार करून वडिलांनी नातेवाईकांच्या ओळखीने मोठ्या बंधूंना शहरात कामधंदा बघा म्हणून सांगितले. मोठे बंधू ‘एमपी’मध्ये कामासाठी गेले. सुरुवातीला त्यांनी तेथे क्लार्क म्हणून अगदी वॉचमन म्हणून देखील काम केले. पुढे ते ‘एबीसी इंडिया प्रा.ली. ट्रान्सपोर्ट’ कंपनीमध्ये रुजू झाले. साधारण 95-95 चा तो काळ होता. जेमतेम पगार घरच्या जबाबदाऱ्या म्हणून मग मोठ्या बंधूंनी व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला. चार वर्षे त्यांनी ट्रान्सपोर्ट व्यवसायात काम पाहिले होते. त्यामुळे त्यांना या व्यवसायाची थोडी माहिती आली होती. पुढे त्यांनी याच व्यवसायात काम करायचे ठरवले. 1998 मध्ये त्यांनी नाशिक येथे ट्रान्सपोर्टचा व्यवसाय सुरू केला. या व्यवसायात थोडा जम बसला. मग त्यांनी मलाही नाशिकला बोलवून घेतले. त्यांच्यासोबत मी काही दिवस काम केले. 2005 मध्ये मग मी स्वतःचे काहीतरी करावे, म्हणून पुण्यामध्ये आलो. पुण्यातील चाकण जवळील चिंबळी भागामध्ये एक रूम घेतली आणि माझी जगण्याची लढाई सुरु झाली.

## शून्यातून घेतली उभारी

चाकण जवळील चिंबळी येथे मी दहा बाय दहाची अक्षरशः खड्डयात असलेली रूम राहायला घेतली. तिथेच स्वयंपाक करायचा. तेच ऑफिस, तिथेच राहायचे असा सगळा रोजचा संघर्ष सुरू होता. जिभेवर साखर ठेवत लोकांशी संवाद साधायचा हे माझे संस्कार माझ्या वडिलांकडून मला मिळालेले होते. याच शिदोरीवर मी माझा व्यवसाय सुरू केला असे म्हणता येईल. चाकण ते पिरंगुट पायी, कोणाकडून लिफ्ट मागत मी काम केले. सुरुवातीला एखादा जॉब देखील मी एक एका कंपनीपर्यंत पोहोच केला. चाकणमध्ये काम सुरू केल्यानंतर दोन वर्षे माझ्याकडे गाडी नव्हती. दोन वर्षांनंतर मला भावाने गाडी दिली. ती गाडी दहा वर्ष मी वापरली. सुरुवातीला श्री मोहोटादेवी ट्रान्सपोर्ट या नावाने आम्ही व्यवसाय करत होतो. 2018 मध्ये मी स्वराज्य लॉजिस्टिकची स्थापना केली. याच कालावधीत वेअर हाऊस देखील सुरू केले

## व्यवसायात स्थैर्यता

वेअर हाऊसचे काम सुरू केल्यानंतर कामामध्ये स्थैर्यता आली असे म्हणता येईल. वेअर हाऊसची संकल्पना ही एक खिडकी योजनेसारखी असते. ज्या कंपन्यांना आपण वेअर हाऊस देतोय त्यांचे सर्व काम एक खिडकी योजनेप्रमाणे आपण करून द्यायचे असते. आज अशा स्वरूपात काम करताना लॉजिस्टिक आणि वेअर हाऊस असे काम करणारे शंभरहून अधिक सहकारी माझ्यासोबत काम करत आहेत. सुरुवातीच्या काळात अगदी दारोदार फिरून मी माझ्या कामाला पोचवले. शंभर पायऱ्या शिजवल्यानंतर एक काम मला मिळाले असे म्हणता येईल. मात्र सतत संवाद साधायचा, लोकांशी चर्चा करायची यातून काहीतरी काम मिळायचे. सर्वात पहिले काम पॉलीकेम या पिरंगुट येथील कंपनीचे मिळाले होते. त्यांचे मटेरियल नाशिकला घेऊन जायचे होते. यानंतर ॲटलास कॉपको, किर्लोस्कर अशा कंपन्यांचे काम मिळत गेले साधारण शंभर कंपन्यांचे काम आम्ही आजवर केले असेल.



## संस्कारांमुळे मिळाली संयमी शिकवण

ट्रान्सपोर्ट व्यवसाय असा आहे की, दिवस रात्र बघून चालत नाही. कोणत्याही वेळेला काय आणीबाणी असेल हे सांगता येत नाही. असेच एकदा एका चालकाचा अपघात झाला. मध्यरात्री फोन आला. तातडीने आम्ही अपघातस्थळी पोहोचलो. तिथे गेल्यावर चालक जागेवरच गेल्याचे कळले अशा घटनांमध्ये अतिशय हतबल व्हायला होते. एखाद्या कुटुंबातील कर्त्या माणसाचा जीव जाणं हे फार भयानक.. अशा परिस्थितीतून स्वतःला सावरत समोरच्या कुटुंबाला धीर देणे, त्यांना मदत करणे खूप जिकिरिचे होऊन जाते. मात्र अशाही परिस्थितीत आपले संस्कार आपल्या कामी येतात असेच मला वाटते. याही प्रसंगात आजूबाजूच्या अनेकांनी मदत केली. गाडीतील मटेरियल बाहेर काढून ते कंपनीला पोचवले.

> **“ आमच्या आई-वडिलांच्या वागणुकीतून अनेक असे संस्कार कळत नकळत आमच्या जीवनावर होत गेले. एकदा पंढरपूरच्या विठोबा मंदिरामध्ये वडील आणि चुलते दर्शन बारीमध्ये असताना प्रचंड गर्दी होती. या गर्दीमध्ये एका महिलेचे सोन्याचे दागिने त्या ठिकाणी पडले . त्या महिलेच्या त्यावेळी लक्षात आले नाही. हे दागिने माझ्या वडील व चुलत्यांना सापडले. वडिलांनी दागिने कोणाचे म्हणून खूप शोधाशोध केली. कोणी आपले दागिने शोधण्यासाठी येईल याची वाट बघत वडील दर्शनबारी मध्येच होते. काही वेळाने ती महिला तिथे आली. त्यांनी त्या दागिन्यांची चौकशी केली. खात्री पटल्यानंतर वडिलांनी तो दागिने त्या महिलेच्या सुपूर्त केले. दुसरा एक प्रसंग ही असाच, आमच्याच गावातील एका शेतजमिनीच्या वादावर माझ्या वडिलांनी बाजू घ्यावी म्हणून भावकीतील एका माणसाने जमीन देऊ केली. पण वडिलांनी खोट्याची मी बाजू घेत नाही असे त्यावेळी निक्षून सांगितले. लाखो रुपयांच्या जमिनीचाही मोह त्यांना झाला नाही. अशा अनेक प्रसंगांचा मनावर अतिशय खोलवर परिणाम झाला. ज्यांच्या घरी अठराविश्व दारिद्र्य आहे. त्यांना जमीन जुमला अगदी सोन्यासारख्या गोष्टीचा देखील मोह होत नाही. हि बाब आजही त्यांच्या संस्कारच्या रूपाने मनावर खोलवर रुजलेली आहे. म्हणूनच आम्हाला आमच्या आई वडिलांचा सार्थ अभिमान आहे.**
> -शंकर रामकिसन तांबे

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। मंगळवार ।
। दि. 25 मार्च 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## पिंपरी-चिंचवडमध्ये पुन्हा उलघडणार

# धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची शौर्यगाथा!

### दिवंगत हिराबाई लांडगे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ कार्यक्रम

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**शांती ब्रह्म सोशल फाऊंडेशनतर्फे भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या मातोश्री दिवंगत हिराबाई किसनराव लांडगे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ "धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज शंभू शौर्यगाथा " या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.**




शांती ब्रम्ह सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष विजय चौधरी यांनी याबाबतची माहिती दिली. येत्या दि.३१ मार्च रोजी सायंकाळी 6.30 वाजता सेक्टर क्रमांक 6, मोशी प्राधिकरण ग्राउंड, जलवायु विहार येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या निमित्ताने सायंकाळी साडेसहा ते सव्वा सात यादरम्यान शाहीर श्री. गुरुप्रसाद नानिवडेकर आणि सहकारी श्री शिव शंभू चरित्र पोवाडा गायन करतील. त्यानंतर अतिथी सन्मान, सुप्रसिद्ध भजन लोकसंगीत गायक, पार्श्वगायक, संगीतकार व अभिनेता अवधूत गांधी यांच्या सुश्राव्य आवाजात विविध लोकसंगीत कार्यक्रमाचा आस्वाद घेता येणार आहे. सायंकाळी 8 वाजता इतिहासाचे गाढे अभ्यासक,प्रभावी वक्ते प्रा. नितीन बानुगडे "धर्मवीर छत्रपती श्री. संभाजी महाराज" शंभू शौर्यगाथा या विषयावर बोलणार आहेत.

### मान्यवरांची उपस्थिती...!

कार्यक्रमाला अयोध्या श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी श्री गोविंददेव गिरी यांचे शुभाशिर्वाद लाभले आहेत. तर पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, पी.एम.आर.डी.ए. आयुक्त डॉ. योगेश म्हसे, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, संत तुकाराम महाराजांचे 21वे वंशज ह.भ.प. प्रशांत महाराज मोरे, कारागृह व सुधारसेवा महानिरीक्षक डॉ. विठ्ठलराव जाधव, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, मल्लविद्या भूषण किसनराव लांडगे उपस्थित राहणार आहेत.



# प्रवेश सुरु

## मोरया शिक्षण संस्था

**एम्. एस्. एस्. बालकमंदिर**
**सुदर्शननगर, चिंचवड, पुणे ३३**
मराठी व सेमी इंग्लिश
शिशुवर्ग, बालवर्ग साठी

**प्रवेश मर्यादित**

**श्रीमती पार्वतीबाई विद्यालय**
**श्रीधरनगर, चिंचवड, पुणे ३३**
इयत्ता १ ली साठी फक्त

**व्ही. के. माटे हायस्कूल श्रीधरनगर,**
**चिंचवड, पुणे ३३**
इयत्ता ५ वी, ८ वी साठी फक्त

**इंग्रजी माध्यमासाठी प्रवेश सुरू**
Play group to std 7th

अधिक माहितीसाठी शाळेच्या कार्यालयात संपर्क करावा.

एम्. एस्. एस्. बालकमंदिर व इंग्रजी माध्यम शाळा : स. ९ ते दु. १२

श्रीमती पार्वतीबाई विद्यालय व व्ही. के. माटे हायस्कूल : स. ११ ते दु. २


मोरया शिक्षण संस्था
Computer Vacation Batch
ADMISSIONS OPEN
2025-26
'C' भाषा ₹ १३००/-
'C++' भाषा ₹ १३००/-
बेसिक जावा ₹ १३००/-
स्क्रॅच ॲनिमेशन ₹ १३००/-
बेसिक टॅली ₹ १५००/-
एम.एस. ऑफिस ₹ १५००/-
कोरल ड्रॉ ₹ ११००/-
Adobe AB फोटोशॉप ₹ ११००/-
सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा. अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.
ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI


PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education

EDUCATING **MIND & HEART**

## ADMISSIONS OPEN
**FOR AY 2025-26**

# Holistic Empowering Learning

IT ALL **STARTS HERE**



| 42 | 55+ | 11+ | 17K+ | 600+ | 13K+ |
|---|---|---|---|---|---|
| YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION | NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS | CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA | 17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES | TEACHING AND NON TEACHING STAFF | 13,000 ALUMNI ACROSS GLOBE |

**PRIYADARSHANI** GROUP OF SCHOOLS

BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA

+91 8668755826

alandi@priyadarshanischools.org

www.priyadarshanischools.org